
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्य दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅली काढण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ

भारतीय स्वातंत्र्यदिन शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

याप्रसंगी सुरक्षा रक्षक व राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने संचलन करून राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. राष्ट्रगीतासह महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्प वाहून मान्यवरांसह उपस्थितांनी अभिवादन केले. यानंतर विद्यापीठ परिसरातून विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने तिरंगा रॅली काढण्यात आली. यामध्ये मान्यवरांसह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी राष्ट्रध्वज घेऊन सहभागी झाले. राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने 'हर घर तिरंगा' सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता. तिथेही उपस्थितांनी राष्ट्रध्वजासह सेल्फी काढण्यास मोठा प्रतिसाद दर्शविला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. ज्योती जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2025
पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठातर्फे तिरंगा रॅली

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. विद्यापीठाचे सुरक्षारक्षक आणि राष्ट्रीय छात्रसेनेच्या वतीने संचलन करून राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्प वाहून उपस्थितांनी अभिवादन केले. यानंतर विद्यापीठ परिसरातून विद्यार्थी विकास विभागातर्फे तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे 'हर घर तिरंगा' सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. ज्योती जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, स्वागत परुळेकर आदी उपस्थित होते.

17 AUG 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरुंनी व्यायाम केला.. व्यायामशाळेचा रिपोर्ट ओके आला

## विद्यार्थी वसतिगृहात उभारली अत्याधुनिक व्यायामशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या अत्याधुनिक व्यायामशाळेचे उद्घाटन केल्यानंतरच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथील साधनांच्या आधारे हलका व्यायाम केला आणि व्यायामशाळेबद्दल समाधानही व्यक्त केले.

**१३**
लाख ८५ हजार ६५४ रुपये इतका आला खर्च

ट्वेल्ह स्टेशन जीमसह केबल क्रॉस ओव्हर मशीन, पेक डेक, लॅट पुली, रोईंग मशीन, अँडक्टर मशीन, लेग कर्ल व एक्स्टेंशन मशीन आणि केबल अँड पुली मशीन अशा अत्याधुनिक साधनांसह शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी या अत्याधुनिक व्यायामशाळेची उभारण्यात करण्यात आली आहे.

विद्यार्थी वसतिगृहाच्या आवारात १६१५ चौरस फुट इतक्या जागेवर ही व्यायामशाळा असून तिच्या उभारणीसाठी १३ लाख ८५ हजार ६५४ रुपये इतका खर्च झाला आहे.

उद्घाटनानंतर विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी उपस्थितांना विविध उपकरणांवर व्यायाम कसा करतात, याची प्रात्यक्षिके दाखविली. त्यानुसार कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह उपस्थित सर्वच अधिकाऱ्यांनी या उपकरणांवर हलकासा सराव करून पाहिला.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. ज्योती जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रामचंद्र पवार, आदींसह मान्यवर उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृह आवारातील व्यायामशाळेतील साधनांवर कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यायामाचा अनुभव घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 AUG 2025
सकाळ

# राष्ट्रीय मानांकनात विद्यापीठ ४० व्या स्थानी

## शैक्षणिक-संशोधनात सर्वाधिक गुण; राज्यात चौथ्या क्रमांकावर

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : शैक्षणिक-संशोधन उत्कृष्टतेत (अॅकॅडमी रिसर्च अँड एक्सलन्स) सर्वाधिक गुणांची कमाई करत शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय मानांकनात

४० वा क्रमांक मिळविला आहे. महाराष्ट्रात विद्यापीठ चौथ्या क्रमांकावर आहे. देशभरातील विद्यापीठांचा समावेश असलेल्या आऊटलूक आयसीएआरई-२०२५ मानांकन जाहीर झाले आहे. टॉप-७५ विद्यापीठांना मानांकन मिळाले असून, त्यात महाराष्ट्रातील सात विद्यापीठांचा समावेश आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाला विविध पाच निकषांत एकूण ८३१.३३ गुणांसह राष्ट्रीय पातळीवर ४० वा, तर महाराष्ट्रामध्ये चौथा क्रमांक मिळाला. या मानांकनातील निकषांत विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधन उत्कृष्टता निकषात सर्वाधिक ३६९.१९, इंडस्ट्रीज

> या मानांकनातून राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन विषयक कामगिरीतील उत्कृष्टतेवर शिक्कमोर्तब झाला आहे. नजीकच्या काळात अशा स्वरूपातील विद्यापीठाचे मानांकन वाढविण्यासाठी विद्यापीठाचे सर्व घटक प्रयत्नशील राहतील.
> **-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**



इंटरफेस अँड प्लेसमेंटमध्ये १७१.७८, सोयी-सुविधांसाठी ११८.९४, प्रशासन आणि विस्तार कार्य १०९.८३, तर विविधता आणि समाजसंबंध निकषात ६१.५९ इतके गुण मिळाले आहेत. एनआयआरएफ रँकिंगमध्ये विद्यापीठ ५१-१०० या रँकबँडमध्ये होते. या आयसीएआरई मानांकनात १-५० या रँकबँडमध्ये पोहोचले असून, राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचा क्रम वधारला आहे.

नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या डीएसटी-पेअरच्या 'हब-अँड-स्पोक' उपक्रमांतर्गत गेल्या चार महिन्यांपूर्वी शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळूरसमवेत 'स्पोक' म्हणून जोडले गेले आहे. दरम्यान, या मानांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशात तिसरे आणि महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचा क्रम आहे.